**<u>शपथेवर वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास सुरु–</u>**

**<u>प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. के. निरवडेकर यांचेमार्फत –</u>**

हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापूर्वी यातील प्रतिवादी यांनी माझ्याविरुध्द रे.दि.मु.नं.३२/२००९ दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा प्रस्तुत दाव्यातील मिळकतींबाबत दावा इमल्यातून हाकलू नये व भाडोत्री असलेबाबत हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेल्या कैफियतमध्ये परिच्छेद क्र.१४ मध्ये प्रस्तुत दावा मिळकती या वादी यांना दावा मिळकतीचे मूळ मालकांमार्फत भाडोत्रीपणास चालत आलेल्या होत्या व आहेत, त्या व्यतिरिक्त सदरहू दावा इमल्याच्या इतर भागाकडे प्रस्तुत वादीचा कोणताही अधिकार पोहोचत नाही, असे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यातील मिळकती या दावा मिळकतींचे मूळ मालक कासकर यांचेपासून प्रतिवादींच्या ताब्यात आहेत.

**प्रश्नः**– तुम्ही नि.५८ कडे दाखल केलेल्या करआकारणी उतारा मध्ये असणाऱ्या प्रतिवादींच्या नांवाची नोंद तुमच्या माहितीत केंव्हा पासून आहे ?

**उत्तरः**–दहा ते बारा वर्षांपासून माहिती आहे.

मी कासकर यांचेकडून दावा मिळकत सन २००७ मध्ये विक्रीत घेतलेली आहे. सदरची मिळकत विक्रीत घेत असताना मी जाहीरात दिलेली नव्हती. कासकर यांचेशी खरेदीखत व्यवहार करणेपूर्वी दावा मिळकत प्रत्यक्ष पाहण्याचा मला योग आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी दावा मिळकतीमध्ये घर होते व सदर घरामध्ये प्रतिवादी राहणेस होते. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये सिटी सर्वे नंबर, सर्वे नंबर व इमला नंबर नमुद केलेले होते. मी दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी प्रतिवादींना वैयक्तीक नोटीस दिलेली नाही. प्रतिवादींना दावा जमीनीचे मूळ मालक कासकर यांनी नोटीस दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताच्या वेळी दाखल करआकारणी उताऱ्यास प्रतिवादी यांची भोगवटादार सदरी नांवे होती. खरेदीखत करण्यापूर्वी दावा जमीनीचे मूळ मालक यांनी प्रतिवादींची संमती घेतली असे घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये दावा मिळकतीबाबत

प्रतिवादींशी वाद उद्भवलेस ते आपण पाहू, अशी अटी घातलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी प्रतिवादी मूळ मालक कासकर यांना नियमित भाडे देत होते.

हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या बाजूला माझे वडीलार्जित घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माठेवाडा येथे माझे सामाईकामध्ये घर आहे. दावा मिळकत खरेदी करत असताना मिळकतीची परिस्थिती म्हणजे ती शंभर वर्षांपूर्वीची होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी करत असताना इमल्याच्या भिंतींना तडे गेलेले होते व छप्पर नादुरुस्त झालेले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींच्या नांवे स्वतंत्र वीज व पाणी कनेक्शन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रॉपर्टी खरेदीखत घेत असताना प्रतिवादी यांच्या नांवे वीज व पाणी कनेक्शन होते याची मला माहिती होती. सदरचे दोन्ही वीज व पाणी कनेक्शन रद्द करण्याकरीता मी नगरपरिषदेकडे तक्रार अर्ज दाखल केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे कनेक्शन आजतागायत अस्तीत्वात आहेत. दावा मिळकतीतील भोगवटादार सदरातील नावे कमी करण्याकरीता मी नगरपरिषदेकडे अर्ज दिलेले होते. मी नगरपरिषदेकडे वीज कनेक्शन व पाणी कनेक्शन व भोगवटदार सदरातील नांवे कमी करण्याकरीता दिलेले अर्ज न्यायालयात दाखल करु शकत नाही. माझ्या माहितीप्रमाणे दावा मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र ५ गुंठे अधीक थोडे आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा इमल्यातील इमारत १ गुंठे इतक्या क्षेत्रात आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा इमल्याची लांबी ४० ते ४५ फुट व ४० ते ४५ फुट रुंदी इतकी असेल. हे म्हणणे खरे आहे की, दावा इमल्यांबाबत नगरपरिषदेने मला व प्रतिवादी यांना दुरुस्तीबाबतची नोटीस दिलेली होती. मी मालक म्हणून सदर इमल्याची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी मला दावा इमल्याच्या परिस्थितीबाबत कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांनी दावा इमल्यांची स्वतः दुरुस्ती केलेली आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी दावा मिळकतीचे मूळ मालक कासकर यांना चाळीस वर्षे भाडे देत होते व त्याबाबत पावती घेत होते. प्रतिवादी यांनी मला भाड्याची रक्कम मनिऑर्डरने पाठविली याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल

झाल्यानंतर सदरची रक्कम न्यायालयात जमा केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी आजतागायत भाडे रक्कम थकीत ठेवलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांचेमार्फत भाडे थकीत आहे व पोट भाडेकरु ठेवलेले आहे हे माझ्या दाव्यातील व सरतपासातील म्हणणे चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या दाव्यातील सरतपासातील संपूर्ण मजकूर प्रतिवादी यांना मान्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आजतागायत भाडे देत असल्याने व त्यांनी पोट भाडेकरु न ठेवलेने त्यांचा भाडोत्रीपणाचा हक्क अबाधीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले कागदपत्र प्रतिवादी यांना मान्य नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात दाखल केलेले कारण व विनंत्या धांदात खोट्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी चुकीची साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.09.24 18:04:46 +0530
(श्रीमती आर.जी.कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दि.२४/०९/२०२५